# कार्यालय, नागपूर महानगरपालिका
## धरमपेठ झोन क्रं. 2
हरणेमहिला समाज भवनाच्या मागे, गोकुळपेठ, नागपूर - 440010
दुरध्वनी क्रं. 07122565589, 07122567056
ई मेल आय डी –dharampethzone@gmail.com

एक कदम स्वच्छता की ओर

जा. क्रमांक : 283/ac/ASW/2025-26 दिनांक 27/10/2025

**अर्जदार :- श्रीमती. मधुबाला क. चांडक, रा. तिलक नगर नागपूर.**
**गैरअर्जदार :- श्री. अभय नारायण पनपालीया व इतर, रा. तिलक नगर नागपूर.**

सदहु प्रकरणाबाबत अर्जदार यांनी दि. 25/09/2025 रोजी झोन कार्यालयात गैरअर्जदाराबाबत अनधिकृत बांधकाम करीत असल्याबाबत अर्ज सादर केला. नागपूर महानगरपालिका, नागपूर, नगर रचना विभाग सुधारीत परिपत्रक क्र. नगर रचना/अनधिकृत बांधकाम/1373/2025 दि. 22/09/2025 अन्वये गैरअर्जदार व अर्जदार यांना 15/10/2025 रोजी पत्राव्दारे कळवून दि. 24/10/2025 रोजी सकाळी 11.30 वाजता दोघांची सुनावणी सहा. आयुक्त यांच्या कक्षात ठेवलेली होती. त्याप्रमाणे गैरअर्जदार श्री. अभय नारायण पनपालीया व इतर मधून सौ. शिल्पा महेश राठी यांचे पति श्री. महेश राठी दि. 24/10/2025 रोजी सकाळी 11.30 वाजता उपस्थित होते. त्याप्रमाणे त्यांचे म्हणने नोंदवून घेतले. गैरअर्जदार यांच्या म्हणन्यानुसार अनधिकृत बांधकम स्वत: काढण्यास तयार असून इमारतीचा सुधारीत बांधकाम नकाशा मंजुरीकरिता नगर रचना विभागास सादर करण्यात येणार आहे. अनधिकृत बांधकाम पाडण्यास तांत्रिक बाब असल्यमुळे मुदतवाढ देण्याकरिता गैरअर्जदाराने विनंती केली आहे व त्याचा प्रगतिअहवाल वेळोवेळी सादर करणार असे सुनावणी दरम्यान सांगीतले आहे.

अर्जदार श्रीमती मधुबाला क. चांडक यांना दि. 24/10/2025 चा नोटिस त्याच दिवशी तामिल झाल्यामुळे ते सुणावणी करीता येवू शकले नाही परंतु अर्जदार दि. 27/10/2025 रोजी कार्यालयात उपस्थित झाले असता त्यांनी त्यादिवशी सुनावणी देण्यास नकार दिला.

गैरअर्जदार यांना दि. 03/10/2025 रोजी आपल्या मालकीहक्काचे कागदपत्र सादर करण्याचे पत्र देण्यात आलेले आहे. त्याप्रमाणे दि. 13/10/2025 रोजी इमरतीचा मंजूर नकाशा, विक्री पत्र, मालमत्ता पत्रक, बिल्डींग परमिट, प्रोव्हिजनल फायर सर्टीफीकेट इत्यादी सादर केल्याचे दिसून येते.

गैरअर्जदार यांना नोटिस क्र. मनपा/सरंनर/मप्रावनर/कलम 53(1)/585 दि. 09/10/2025 रोजी नोटिस देण्यात आलेला आहे. तसेच त्याप्रमाणे गैरअर्जदार यांना नोटिस क्र. मनपा/सरंनर/मप्रावनर/कलम 54(1)/586 दि. 09/10/2025 बांधकाम थांबविण्याचे नोटिस देण्यात आलेले

Scanned with OKEN Scanner

आहे. सदर इमारती मध्ये 15.5 x 10.25= 158.86 चौ. मी. x 7 = 1112.02 चौ. मी. चे बांधकाम आपले अनधिकृत असल्याचे दिसून येते.

गैरअर्जदार यांच्या म्हणण्याप्रमाणे तांत्रिक बाब असल्यामुळे मला काही दिवसाची मुदत द्यावी अशी विनंती केलेली आहे. त्यामुळे त्यांनी आपल्या इमरतीचा सद्याचा बांधकामाचा मंजूर नकाशा त्वरीत सादर करावा. मंजूर नकाशा प्राप्त न झाल्यास कार्यालयातर्फे दिलेल्या मुदतीत कार्यवाही करण्यात येईल.

**आदेश :-**

**गैरअर्जदार श्री अभय नारायण पनपालीया व इतर रा. तिलक नगर यांनी खसरा क्र. 31, भुखंड क्र. 39ए, घर क्र. 680 येथील अनधिकृत बांधकामाबाबत आपल्या मालमत्तेचे अनधिकृत बांधकामाविरूध्द महाराष्ट्र प्रादेशीत व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 53 अंतर्गत नोटिस मिळल्यापासून 35 दिवसाच्या आत स्वत: अनधिकृत बांधकाम काढून टाकावे. आपण आदेशाचा पालन केले नाही उक्त अधिनियमास नमुद कायदेशीर कार्यवाहीस आपण पात्र राहाल, तसेच विहीत कालावधीनंतर तुमच्या जबाबदारीने व स्वत:च्या खर्चाने अनाधिकृत बांधकाम वेळेत काढून घेण्यात यावे. अन्यथा वरील आदेशाची अंमलबजावणी केली नाही तर महानगरपालिकेव्दारे अनाधिकृत बांधकाम काढण्याची कारवाई करण्यात यईल व त्या कारवाई करिता लागणारा संपूर्ण खर्च आपलेकडून वसूल करण्यात यईल याची नोंद घ्यावी.**

**सहाय्यक आयुक्त**
**धरमपेठ झोन क्र. ०२**
**म.न.पा. नागपूर**

**प्रतिलीपी सविनय सादर :-**

1. मा. आयुक्त तथा प्रशासक, नागपूर महानगरपालिका, नागपूर, सिव्हील लाईन्स, नागपूर.
2. मा. जिल्हाधीकारी, जिल्हाधीकारी कार्यालय, सिव्हील लाईन्स, नागपूर.

**प्रत :-**

1. श्रीमती. मधुबाला क. चांडक, रा. तिलक नगर नागपूर.
2. श्री. अभय नारायण पनपालीया व इतर, रा. तिलक नगर नागपूर.

Scanned with OKEN Scanner

# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर

## विभागिय कार्यालय, धरमपेठ झोन क्र. २

नोटिस क्र. मनपा / ससंनर / मप्रावनर / कलम 53(1) / 585 दिनांक 9 / 10 / 2025

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, 1966 चे कलम 53(1) अंतर्गत नोटीस**

प्रति,

1. श्री. अभय नारायणदास पनपालीया.
2. श्री महेश छगणलाल राठी
3. सौ. शिल्पा महेश राठी,
4. श्री गोपी गंगाराम पिल्ले,
5. सौ. राजश्री गोपी पिल्ले,
6. श्री नारायण क्रिष्णास्वामी,
7. सौ. काजल नटराजन पिल्ले,

मौजा पांढराबोडी, ख.क्र. 31. भु.क्र. 39A. घर क्र. 680. तिळक नगर नागपूर

ज्याअर्थी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, 1966 (यापुढे ज्याचा "उक्त अधिनियम" असा उल्लेख करण्यात आला आहे.) चे कलम 2 (15) सह2 (19) नुसार नागपुर महानगरपालिकेला स्थानिक प्राधिकरण व नियोजन प्रधिकरण म्हणुन प्राधिकृत करण्यात आलेले आहे व उक्त अधिनियमातील कलम 152 (1) नुसार मा. निगमायुक्त किंवा त्यांनी प्रत्यायुक्त केलेल्या अधिकारी / अधिकाऱ्यांनी उक्त अधिनियमातील अधिकारांचा वापर करून प्रभावीपणे अधिनियमाची अंमलबजावणी करणे अपेक्षित आहे. मा. निगम आयुक्त, नागपुर महानगरपालिका, नागपुर यांनी उक्त [illegible] प्रत्यायोजन आदेश क्र. GAD/13/Del Dt. 08/11/2004 द्वारे खालील सही करणाऱ्यांना उक्त अधिनियमातील कलम 53, 54, 55 व 142 चे अधिकार वापरून कार्य करण्याकरीता प्राधिकृत केलेले आहे. व हा आदेश आज रोजी सुध्दा अस्तित्वात आहे.

ज्याअर्थी नियोजन प्राधिकरण म्हणुन दि. **03/10/2025** ला उप संचालक नगर रचना विभाग तसेच धरमपेठ झोन क्षेत्रीय कार्यालयाच्या संयुक्तरित्या मौका चौकशी केलेली असता असे निदर्शनास आलेले आहे कि, आपण आपल्या मालकीच्या महानगरपालिकेच्या अधिकार क्षेत्रांतर्गत असलेल्या भुखंड 39A, घर क्र. **630** , वार्ड क्र.**69** , प्रभाग क्र. **14**, नगर भुमापन क्र.**1048** , शिट नं. ,**मौजा–पांढराबोढी** , तिळक नगर नागपूर तह. व तालुका नागपुर, जिल्हा नागपुर, दर

1. उक्त अधिनियमानुसार आवश्यक असलेल्या परवानगी शिवाय.
2. **दिलेल्या परवानगीच्या विरुध्द.**
3. विकासाची दिलेल्या परवानगी रद्द केल्यानंतर.
4. सुधारीत परवानगीचा भंग करून.

अनुसुची मध्ये दर्शविल्याप्रमाणे अनधिकृत व बेकायदेशीर विकास (बांधकाम) सुरू केलेला आहे / हाती घेतलेला आहे / घडवून आणलेला आहे किंवा जमीनीचा वापर बदलविलेला आहे / बदलविण्यास सुरूवात केलेली आहे.

त्याअर्थी आपणास हा नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासुन पाच आठवड्याचे कालावधीत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात येत आहे

5. सदर्हु भुखंडावरील अनुसुची मध्ये नमुद अनधिकृत व बेकायदेशिर बांधकाम पाडावे.
6. सदर्हु जमिनीचा अनधिकृत वापर थांबवावा. व अनधिकृत बांधकाम पाडावे.

Scanned with OKEN Scanner

उपरोक्त आदेशाचे पालन विहित कालावधीत न केल्यास उक्त अधिनियमात नमुद कायदेशीर कार्यवाहीस आपण पात्र ठराल तसेच विहित कालावधीनंतर तुमच्या जबाबदारी व खर्चाने वरील आदेशाची अंमलबजावणी महानगरपालिकेद्वारे करण्यात येईल व याबाबत संबंधीत पोलिसस्टेशनमध्ये आपल्या विरूध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

:0: अनुसूची :0:

| माळा | भुखंडाच्या / इमारतीच्या अनधिकृत बांधकाम असलेल्या भागाचे विवरण | अनधिकृत बांधकामाचा मोजमापाचे क्षेत्रफळ (चौरस मीटर मध्ये) | शेरा |
|---|---|---|---|
| तळमजला | तळ मजला ते सातवा मजला | A) 15.5 x 10.25 = 158.86 चौ.मी.<br>158.86 x 7 =1112.02 चौ.मी | तळमजला ते सातव्या मजल्याचे बांधकाम नगर रचना विभागाचे अभिमतानुसार मजल्यांची उंची मंजुर बांधकाम नकाशाप्रमाणे 2.85 मी. असुन प्रत्यक्षात विकासकामार्फत 3.00 मी. केल्याने संपुर्ण बांधकाम अनधिकृत असुन पाडुन टाकावे. |
| एकूण अनधिकृत बांधकाम | | = 1112.02 चौ.मी | |

सहाय्यक आयुक्त
धरमपेठ झोन क्र. 2
नागपूर महानगरपालिका नागपूर

**प्रतिलीपी :-**

1) मा. आयुक्त तथा प्रशासक, महानगरपालिका नागपूर यांना माहितीस्तव सविनय सादर
2) मा. जिल्हाधिकारी नागपूर यांना माहितीस्तव सविनय सादर

Scanned with OKEN Scanner